# सुरेश राघव यांच्या चार कविता

## राजधर्म

तुमचा चमत्कार मंत्रतंत्र यावर विश्वास आहे?
माझा आहे बुवा!
कारण १२५ कोटी जनतेच्या आमच्या राजाचा विश्वास आहे.
राजा पृथ्वीवरचा देव आहे.
चमत्कार मंत्रतंत्र यावर अविश्वास म्हणजे राजावरच अविश्वास!
एकवेळ राष्ट्रद्रोह करीन, पण राजद्रोह नाही करू शक्त मी !

आमच्या राजाचा अभ्यासपूर्ण विश्वास आहे
चमत्कार, मंत्रतंत्र वेदकालीन सायन्स आहे.
मंत्र शक्तिशाली मिसाईल्स आहेत.
म्हणून आमचा जनतेचा पूर्ण विश्वास आहे,
नुसते यज्ञमंत्रच पाकिस्तानला हरविण्यास पुरेसे आहेत!

शंका घेण्यासारखी अजिबात जागा नाही.
क्रोधीत अगस्तीने चक्क सगळा समुद्र पिऊन टाकला होता!
समुद्राची मग दया आल्यावर लघवीवाटे मोकळा केला होता.
म्हणून तो खारट झालाय. पण त्याला इलाज नाही.

शंका घेण्याचे काहीच कारण नाही.
संतापग्रस्त परशुरामानी किनाऱ्यावरून सोडलेला बाण जिथे पडला,
तिथपर्यंत जीव घेऊन मागे समुद्र पळाला.
त्या जागी कोकणस्थ ब्राह्मणांचा कोकण निर्माण झाला.

# कविता

चमत्कार आपला अभिजात राष्ट्रीय ठेवा आहे.
मी अतोनात अधीरतेने वाट बघतोय,
पुढील पिढ्यांसाठी राष्ट्रीय ठेवा बनेल
अशा आमच्या राजाच्या नव्या अद्भुत मंत्रतंत्र चमत्कारांची!

मी अतोनात अधीरतेने, उत्साहाने वाट बघतोय
प्राचीन वैदिक प्रगत तंत्रज्ञानाने बनवलेले सुपर सॉनिक विमान
कोणत्या शुभदिनी आकाश चिरीत हवेत झेपावेल!

संतश्रेष्ठ तुकारामाला खास विमानाने सदेह स्वर्गात पाठवणे,
पुन्हा कधी सुरू होणार ती महान परंपरा
मग करता येईल आजच्या तुकारामांचा सन्मान!

कुठल्या दिवशी बघू आम्ही तो भाग्यशाली सोहळा!
स्वत: श्रीराम, राजाला आपला अवतार आणि
राजाच्या हिंदुराष्ट्राला रामराज्य घोषित करीत आहेत!

तेव्हा श्रीराम राजाला समजावत आहेत राजधर्म
राक्षस-शूद्रांचा वध करणे रामराज्यात नाही मानला जाणार अपराध!

कविता

## मेंढरं

मेंढरांचा भला मोठा कळप चाललाय
काही मेंढरे गंभीरपणे चाललीयत
काही मेंढरं बागडत चाललीयत
काही मेंढरं जरा कळपाबाहेर गेली,
तरी घाबरून परत येतात कळपात.
मेंढरं विचार करीत नाहीत,
निमूटपणे चालत राहतात एकापाठोपाठ निमूट
मेंढरं उपासमार सहन करतात निमूटपणे
मेंढरं रांगेतच मरून पडतात सभ्यपणे
मेंढरं आवंढा गिळावा तसा गिळून टाकतात अन्याय!
मेंढरं करीत नाहीत शिकार कुणाची, लांडग्या कोल्ह्यासारखी
त्यांच्यासारखी धूर्त लबाडही नसतात मेंढरं
मेंढरं अगदी साधीभोळी असतात
हुरळून लांडग्या-कोल्ह्याच्या बोलण्यावर सहज विश्वास ठेवतात!
मेंढरं सवयीनं चाललीत शांतपणे
मेंढरं मागे वळून बघत नाहीत :
त्यांना काही पत्ता नाही बिचाऱ्यांना
आज आपल्यामागे मालक नाही, कसाई आहे.

## नवी (इ)सापनिती

सर्व प्राण्यांना सारखेच स्वातंत्र्य!
जितकं स्वातंत्र्य लांडग्या कोल्ह्यांना, तितकंच हरीण बकऱ्यांना
जंगलच्या राजाचा तसा आदिम नियमच होता.
जीव मुठीत धरून चरायच्या हरीण-बकऱ्या सावध
तरीही दोनचार हरीण-बकऱ्यांची व्हायचीच पारध.
बिचाऱ्या हरीण बकऱ्यांनी शेवटी राजाकडे गाऱ्हाणे नेले.
राजाने ऐकले त्यांचे गाऱ्हाणे आणि जजमेंट दिले.
आहे, तोच जंगलाचा सनातन धर्म आहे.
सर्वांनी तो पाळणे हेच तुमचे नियत कर्म आहे.

गरीब विचारे प्राणी मरता मरता जगत होते.
बिचारे पीडित प्राणी जगता जगता मरत होते.
कुणीच बापड्यांना वाली नव्हते.

काळ बदलला, क्रांतिकारी मोठा झंझावात आला.
जंगलात नवा न्यायी राजा आला.
त्याने पीडित प्राण्यांना दिलासा दिला. जंगलासाठी नवा अधिनियम जारी केला.
हरीण-बकऱ्यांना स्वातंत्र्याची सुरक्षित कुरणांची हमी दिली.
कोल्ह्या लांडग्यांच्या जगण्याच्या स्वातंत्र्याची व्याख्या निश्चित केली.

नव्या संविधानामुळे सगळे हिंस्र प्राणी अस्वस्थ झाले.
हरीण शेळ्यांना खास आरक्षण का म्हणून ओरडू लागले.
अन्याय अन्याय म्हणून छाती पिटू लागले,
जंगलाचा जुनाच सनातन धरम परत हवा म्हणू लागले.

मग पूर्वी कधी घडली नाही अशी अघटित गोष्ट घडली.
वाघसिंहाचीच नाही, कुत्रेचोर बिबट्याची, कोंबड्याचोर कोल्ह्याची
अभूतपूर्व एकजूट झाली.
जंगलच्या जुन्याच राजाला त्यांनी पुन्हा सत्ता दिली.
सत्तेवर येताच त्याने सबका भला चा नारा दिला
जंगल सब का, सब जंगल के चा पुकारा केला.
मग सर्व प्राण्यांनी दिली ग्वाही
मन की बात ध्यानात सर्वांनी घ्यावी
जितके स्वातंत्र्य बकऱ्यांना, तितकेच लांडग्यांनाही!

## अब्दुलपासून आफरीनपर्यंत

शेवटचा पॅसेंजर सोडल्यावर
अब्दुल आपल्या झोपडीबाहेरच्या रस्त्यावर रिक्षा बंद करू लागला,
तर त्याला दिसली रिक्षात पॅसेंजरची विसरलेली बॅग!
अब्दुलने बॅगची चेन उघडली, आत नोटांची बंडले होती!
मग तो तसाच माघारी फिरला, पोलीस स्टेशनवर आला.
सर्व हकीकत ऐकल्यावर इन्स्पेक्टर म्हणाला,
एखादा ढापा तो नहीं ना सुव्वर के?
एवढ्यात बॅगचा मालक धापा टाकत पोलीस स्टेशनात आला.
सात लाख रुपये जसेच्या तसे आहेत, नोटा मोजून झाल्यावर घाम पुशीत म्हणाला.
मुलीच्या लग्नासाठी काढले होते, बरबाद झालो असतो म्हणताना गहिवरला
मग अब्दुलचे पुन्हा पुन्हा आभार मानत
हजाराच्या दोन नोटा त्याच्या हातात कोंबल्या
आणि सद्गदित होत इन्स्पेक्टरला म्हणाला,
लग्न मोडलं असतं आणि मी पण मोडलो असतो राव.
बघा, त्यांच्यापैकी आहे तरी किती प्रामाणिक आहे!
काय झालं कुणास ठाऊक अब्दुलला!
घेतलेल्या दोन्ही नोटा परत करून अब्दुल जड पावलांनी बाहेर पडला.
फक्त त्याने भरल्या डोळ्याने एकदा वळून पाहिलं
इन्स्पेक्टर दोन्ही नोटा खिशात टाकीत होता.
आणि बॅगचा मालक अब्दुलकडे गोंधळून आश्चर्याने बघत होता.
आफरिनने पुण्यात हवी असलेली सर्व पुस्तके खरेदी केली.

आणि पुन्हा बारामतीची बस पकडली. तिच्या शेजारच्या सीटवर एक सिनियर आले.
एवढा कसला पुस्तकांचा गठ्ठा, त्यांनी सहज विचारल्यावर
आफरिन म्हणाली, इंजिनीयरिंगच्या शेवटच्या वर्षाची किताबे आहेत ही.
बारामतीला मिळत नाहीत, म्हणून पुण्याला आले.
मग त्यांनी स्वत:ची ओळख करून दिली.
मी प्राध्यापक दामले. अडतीस वर्षे विद्यादानानंतर नुकतीच सेवानिवृत्ती मिळाली.
त्यानंतर त्यांच्या स्टॉपवर ते उतरून जाईपर्यंत
त्यांच्या भरपूर गप्पा झाल्या.
त्यांचा स्टॉप आल्यावर, ते टॉप क्लासध्ये पास हो, म्हणत उठले.
तिनेही थँक्यू सर असं अदबीनं म्हटले.
उतरण्यासाठी वळताना प्राध्यापक पुन्हा म्हणाले,
इंजिनीयर झाल्यानंतर इशरत जहां होऊ नकोस, एवढंच आफरिन.
आणि तसेच हसत घाईघाईने उतरून गेले.

त्यानंतर सगळ्या प्रवासात का कुणास ठाऊक!
सरीमागून सरी याव्यात पावसाच्या
तशी आफरिन राहून राहून रडत राहिली,
मुसलमान होने की इतनी बडी सजा अल्ला!
तिलाही ऐकू येणार नाही, इतक्या हळू आवाजात ती स्वत:लाच विचारत राहिली.

**– सुरेश राघव**
suresh.raghav1952@gmail.com